# ताथवडे येथील राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात TEDx – 2026 कार्यक्रम संपन्न

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात, ताथवडे येथे मार्च 7 मार्च 2026 (शनिवार) रोजी

वार्षिक परंपरा नुसार TEDx कार्यक्रम महाविद्यालयाच्या जयवंत सभागृहात आयोजित केला. समन्वयक प्रा. (डॉ.) सत्यजित कासार यांनी सांगितल्याप्रमाणे राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना नवोपक्रमासाठी प्रेरित करणे हा नेहमीच हेतू असतो. महाविद्यालयाचे संचालक आणि या कार्यक्रमाचे आयोजक प्रा.(डॉ.) अविनाश बडापे सर यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत TED टॉकचे महत्त्व व्यक्त केले. त्यांनी TEDxJSPMRSCOE ब्रँडचा वारसा स्पष्ट केला. त्या अनुषंगाने यावेळी "विरोधाभास" ची थीम विशद केली आणि श्रोत्यांना वक्त्यांनी मांडलेल्या कल्पनांशी संलग्न होण्यासाठी प्रोत्साहित केले. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या नित्यक्रमात अनुभवल्याप्रमाणे




"विरोधाभास" थीमवर त्यांचे विचार व्यक्त केले. वक्त्यांमध्ये श्रीमती आर. विमला या आयएएस अधिकारी आणि नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथील निवासी आयुक्त आहेत. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ.अविनाश खरात यांनी ह्यूमन अर्थिंग या विषयावर भाषण केले. श्री. मोहित कोकीळ आणि नितीश कांकरिया यांनी व्यवसायात आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरण्याच्या विरोधाभासावर आपले विचार मांडले. अभिनेता श्रीधर दुबे याने त्याच्या संघर्षमय दिवसांतील यश आणि अपयशाचा विरोधाभासी अनुभव व्यक्त केला. कार्यक्रम भारतीय नौदलातील लेफ्टनंट कमांडंट विजय नायर आणि युवा उद्योजक अश्विनी वर्मा यांच्या व्याख्यानांचा साक्षीदार होता. कबड्डीपटू व पुणेरी पलटणचे कर्णधार श्री अस्लम इनामदार यांच्या शेवटच्या व्याख्यानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ध्येय साध्य करण्यासाठी अपयश आणि अडचणींमधून सातत्य ठेवण्यावर त्यांनी भर दिला. शिवानी अहिरे यांच्या सुरेल आवाजाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालक प्रा. (डॉ.) अविनाश बडपे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. सत्यजित कासार, सहआयोजक अंकुर क्षीरसागर आणि त्यांच्या संपूर्ण टीमने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. सर्व अतिथी वक्त्यांनी या कार्यक्रमाच्या एकूण व्यवस्थापनाचा आनंद आणि समाधान व्यक्त केले.



# माजी विद्यार्थ्यांची प्रेरणादायी भेट



■ प्रा. विद्याश्री कोकणे (राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ताथवडे)

जेएसपीएम राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ताथवडे येथील ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाने माजी विद्यार्थ्यांची भेट आणि अभिवादन कार्यक्रम घेतला. यशस्वी पदवीधरांचे मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि सामायिक शिक्षण अनुभवांना प्रोत्साहन देणे हा उद्देश होता. पॅनेल चर्चा झाली. राजेश सबने (एमडी ऑटोवन ग्रुप ऑफ कंपनी), अमित अस्ती (एचआर ऑफ एम्क्युअर फार्मास्युटिकल लिमिटेड), अमोल जैन (डायरेक्टर ऑफ एचसीएल), कृष्णा चव्हाण (व्हाइस प्रेसिडेंट, ॲप डेव्हलपमेंट सिटी बँक), हर्षद कुलकर्णी (स्टँटेक इंडिया प्रोजेक्ट कंट्रोलर), अश्विनी माने (सिनिअर सॉफ्टवेअर इंजिनिअर), सागर पाटील (असोसिएट डायरेक्टर युबीएस), सूरज डाकले (व्हाइस प्रेसिडेंट क्लाऊड इंजिनिअरिंग) यांनी मार्गदर्शन केले. शैक्षणिक आव्हानांवर मात करण्यापासून ते व्यावसायिक टप्पे गाठण्यापर्यंत चिकाटी, अनुकूलता आणि आयुष्यभर शिकण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. व्यावसायिक कार्यक्षेत्रासाठी मार्गदर्शन झाले. ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. सौरभ तायडे यांनी संयोजन केले. प्राचार्य डॉ. अविनाश बडधे, संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे संचालक डॉ. रवी जोशी, अनिल भोसले यांचे सहकार्य लाभले. संस्थेचे संस्थापक डॉ. टी. जे. सावंत यांनी प्रोत्साहन दिले.



# जपानमध्ये इंटर्नशिपची श्लोका मानकरी

■ प्रा. विद्याश्री कोकणे (राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग)

-जेएसपीएमचे ताथवडेतील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संगणक अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षाची विद्यार्थिनी श्लोका मेंगडे हिला जपानच्या दाई-इची लाइफ टेक्नोक्रॉस कंपनीमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. ही कंपनी जपानमधील आयटी व जीवन विमा गट आहे. कंपनीने हैदराबादमध्ये क्षमता केंद्र जीसीसी (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर) सुरू केले आहे. यासाठी द्विभाषिक (जपानी -इंग्रजी) व्यवस्थापन रचना मजबूत करीत आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जपानी भाषा शिक्षक संघाने जपानी सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती. त्यात श्लोकाने प्रथम क्रमांक पटकावला. कंपनीने बक्षीस म्हणून इंटर्नशिपची संधी दिली. त्यामुळे एक महिन्यासाठी श्लोका जपानला जाणार आहे. ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. सौरभ तायडे, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सीमा केदार यांनी सहकार्य केले. प्राचार्य डॉ. अविनाश बडधे, संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक डॉ. प्रा. टी. जे. सावंत यांनी कौतुक केले.

# राजर्षी शाहू कॉलेजमध्ये ‘इनोव्हिजन’ तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

**पिंपरी :** जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने दि २ व ३ फेब्रु २०२६ रोजी दोन दिवस "इनोव्हिजन २०२६" या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २ रोजी स १० वा . उद्घाटन होईल.या प्रसंगी उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, (IISER) चे अध्यक्ष डॉ अरविंद नातू, माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर, एनआयपीएम पिंपरी चिंचवड चॅप्टरचे अध्यक्ष प्रदीप मानेकर, कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आयोजन समितीचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मते, डॉ. अजय पैठणे आणि डॉ. प्रवीण घटे यांनी सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. इनोव्हिजन २०२६ मुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त क्षमतांना वाव देण्याची, संघभावना विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

“इनोव्हिजन २०२६ हा नवकल्पना, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव ठरत असून, तंत्रज्ञान व मूल्यांच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देण्यासाठी तरुण पिढीला सक्षम करण्याचा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे,” असे मत संस्थेचे संचालक-सचिव प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी व्यक्त केले.

**सकाळी १० वा. :** टेक्नो-सोशल महोत्सव : 'इनोव्हिजन २०२६', उपस्थिती : डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. अरविंद नातू, डॉ. दीपक शिकारपूर, प्रदीप मानेकर, डॉ. अविनाश बडधे, आयोजक : राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ताथवडे, स्थळ : राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ताथवडे.

# जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे - डॉ. नातू

पिंपरी (दै. संध्या) :

दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेलेले असते. मात्र आपण ती वैज्ञानिक दृष्ट्या जाणून घेतली पाहिजे. यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजेत. असे मत

कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, (IISER) चे अध्यक्ष डॉ अरविंद नातू यांनी व्यक्त केले.

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "इनोव्हिजन २०२६" या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते .



या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर,मॅग्ना इंटरनॅशनल चे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, श्यामसुंदर मडेवार, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ पी.पी विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ बडधे म्हणाले कि,इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे.

इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना "समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान" अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ शिकारपूर म्हणाले कि,२०२६ सालामध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वात महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि

रशिया-युक्रेन युद्ध, मध्यपूर्वेतील  योजना सादर करण्यात आली आहे,  युवकांच्या कौशल्य विकासावर लक्ष  आर्थिक व्यवहारांची योग्य पडताळणी,  माहिती

# जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे : डॉ. नातू

**पिंपरी** : दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेले असते. मात्र आपण वैज्ञानिक दृष्ट्या ते जाणून घेतले पाहिजे.यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजेत. असे मत कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ अरविंद नातू यांनी व्यक्त केले.



जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इनोव्हिजन २०२६ या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते .

या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर,मॅग्रा इंटरनॅशनल चे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, श्यामसुंदर मडेवार,युवा उद्योजक राजेश साबणे, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ पी.पी विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे आदी उपस्थित होते.

डॉ बडधे म्हणाले कि,इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे.इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ शिकारपूर म्हणाले कि,२०२६ सालामध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वात महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे . जागतिकीकरणामुळे केवळ तंत्रज्ञान माहीत असणे पुरेसे नाही, तर संवाद साधणेही महत्त्वाचे झाले आहे. भारतीय कंपन्या आता युरोप, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या देशांमध्ये आपला व्यवसाय वाढवत आहेत. अशा वेळी जपानी, जर्मन, फ्रेंच किंवा मँडरीन (चिनी) भाषा येणाऱ्या तंत्रज्ञांना इतरांच्या तुलनेत ३० ते ४० टक्के जास्त पगार आणि परदेशात कामाची संधी मिळत आहे. एआय भाषांतर करत असले तरी, मानवी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि व्यावसायिक करारांसाठी भाषेचे ज्ञान असणे हे एक मोठे कौशल्य मानले जात आहे.तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडेलवर काम करत आहेत. डॉ पैठणे म्हणाले की या महोत्सवामध्ये सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी आपले विविध क्षेत्रातील प्रकल्प सादर केले आहेत. यामध्ये स्किल डेव्हलपमेंट, शोध निबंध, प्रकल्प प्रदर्शन, रोबोटिक्स, कॉंक्रीट क्यूब, इलेक्ट्रो सर्किट डिझाईन, कोडिंग अशा विविध प्रकल्पांचा या मध्ये समावेश आहे. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर मते यांनी तर स्वागत समन्वयक डॉ. अजय पैठणे केले. आभार डॉ. प्रवीण घटे यांनी मानले.सूत्रसंचालन अथर्व मुनोत, तेजस चौधरी, इशिता जाधव, ओमकार काळे यांनी केले.

कंटेनरच्या धडकेत

वाटत. निवडणुकीच्या काळात यांनी म्हटले आहे.

# राजर्षी शाहू कॉलेजमध्ये इनोव्हिजन तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

पिंपरी : जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने दि २ व ३ फेब्रुवारी रोजी दोन दिवस इनोव्हिजन २०२६ या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २ रोजी सकाळी १० वाजता उद्घाटन होईल.या प्रसंगी उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्स चे अध्यक्ष डॉ अरविंद नातू, माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर, एनआयपीएम पिंपरी चिंचवड चॅप्टरचे अध्यक्ष प्रदीप मानेकर, कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे उपस्थित राहणार आहेत.

व
य
श
ज
अ
सं
सम
स्व
प्रब
के
क
सम



## प्रा. बारीन शेख यांना पीएच. डी

■ एमआयटी महाविद्यालय, आळंदी

आळंदीतील एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील प्रा. बारीन शेख यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठ, इंदूर (मध्य प्रदेश) यांनी संगणकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी 'बिग डेटामध्ये फेअर शेड्युलरचे लोड बॅलेंसिंग परफॉर्मन्स सुधारण्यासाठी पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशन दृष्टिकोन' या विषयावर संशोधन केले. या संशोधनासाठी बिग डेटा फेअर शेड्युलरच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी निसर्ग-प्रेरित अल्गोरिदम पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशनचा वापर केला आहे. त्यांचा संशोधन विषय बिग डेटा प्रणालींमध्ये वापरल्या जाणाऱ्या फेअर शेड्युलर या तंत्राच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यावर आधारित आहे. मोठ्या प्रमाणावर डेटा प्रक्रिया करताना विविध कामांमध्ये संसाधनांचे योग्य वाटप (लोड बॅलन्सिंग) होणे अत्यंत महत्त्वाचे असते. या समस्येवर उपाय म्हणून त्यांनी पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशन या निसर्ग-प्रेरित अल्गोरिदमचा वापर केला. या संशोधनात पीएसओ पद्धतीच्या साहाय्याने शेड्युलरची कार्यक्षमता, गती आणि संसाधनांचा वापर अधिक संतुलित करण्याचा प्रयत्न केला. या दृष्टिकोनामुळे बिग डेटा प्रोसेसिंग अधिक जलद, अचूक आणि परिणामकारक होऊ शकते, ज्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर डेटा हाताळणाऱ्या उद्योग, संशोधन संस्था आणि क्लाऊड कम्प्युटिंग प्रणालींना होऊ शकतो. त्यांना डॉ. दीपिका पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाचे कुलगुरू व महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी, ''हे संशोधन देशातील तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल,' असा विश्वास व्यक्त केला.

## निर्भय कन्या अभियान

■ मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, मोशी

पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी मोशी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या सहकायनि निर्भय कन्या अभियान राबविले. मुलींमध्ये कायदेविषयक जागरूकता, आरोग्याविषयी मार्गदर्शन आणि आत्मसंरक्षण कौशल्ये विकसित करणे हा उद्देश होता. मॉडर्न लॉ महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. अनन्या बिबवे (महिलांचे हक्क व संरक्षणासंबंधी कायदे), डॉ. प्रेरणा गोळेकर-गोपाले (बदलती जीवनशैली आणि पीसीओडी व थायरॉईड), शिर्के स्पोर्ट्स अकॅडमीच्या गौरी शिर्के व सचिन शिर्के (आत्मसंरक्षण) आदी विषयांवर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एन. ढोले व उपप्राचार्या डॉ. वृषाली तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास अधिकारी स्नेहा पाटील व डॉ. एस. एस. फरांदे यांनी समन्वय साधला. श्रुती भगवत, सानिका डबडे आणि जान्हवी सावरकर या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले.




## जॉब फेअरमधून रोजगार

■ राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, ताथवडे

जेएसपीएम राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ताथवडे येथील ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल व बोर्ड ऑफ अँप्रेन्टेनशिप ट्रेनी मुंबई यांच्यातर्फे उद्योग व शिक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या आणि विद्यार्थ्यांमधील रोजगारक्षमता वाढवण्याच्या उद्देशाने जॉब फेअरचे आयोजन केले होते. आयटी, कोअर इंजिनिरिंग, सेवा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील ७५ हून अधिक नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट तांत्रिक सहाय्य, डेटा सेवा, डिजिटल ऑपरेशन्स ट्रेनी पदांसाठी मुलाखती झाल्या. विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधला. उद्योगांच्या सध्याच्या गरजा समजून घेण्यासाठी आणि विविध करिअरच्या संधी शोधण्यासाठी एक मौल्यवान व्यासपीठ मिळाले. विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांना सर्वाधिक अनुकूल असलेल्या पदांसाठी अर्ज करणे शक्य झाले. कंपन्यांनी अभियोग्यता चाचण्या, तांत्रिक मुलाखती आणि एचआर संवाद फेऱ्या घेतल्या. प्रशिक्षक आणि प्लेसमेंट समन्वयकांनी विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या तयारीसाठी मदत केली. अनेक विद्यार्थ्यांची भरती प्रक्रियेसाठी निवड झाली. महाविद्यालयाचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. सौरभ तायडे यांनी संयोजन केले. संस्थेचे संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे, संस्थेचे संस्थापक डॉ. प्रा. टी. जे. सावंत यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अविनाश बडदे, संचालक डॉ. रवी जोशी, अनिल भोसले, एन. एन. वडोदे (उपसंचालक, बोर्ड ऑफ अप्रेंटिशिप ट्रेनी) यांचे सहकार्य लाभले.



## विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीयविषयक व्याख्याने

■ मराठवाडा मित्रमंडळाचे पॉलिटेक्निक, काळेवाडी

मराठवाडा मित्रमंडळ पॉलिटेक्निकमध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास' विषयावर युनायटेड किंगडम येथील सार्वजनिक सुरक्षा क्षेत्रातील प्रमुख व्यवसाय विश्लेषक केविन फोगार्टी यांचे व्याख्यान झाले. त्यांनी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीमध्ये पीएच.डी. केली आहे. विविध देशांमधील सॉफ्टवेअर डोमेनमध्ये त्यांचा अनुभव आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना, व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व, व्यावसायिक जीवनात आवश्यक कौशल्ये, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, आंतरराष्ट्रीय स्तरावर करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. जागतिक स्तरावर काम करताना येणाऱ्या आव्हानांचा सामना कसा करावा? तांत्रिक ज्ञानाबरोबरच सॉफ्ट स्किल्स कशा प्रकारे विकसित कराव्यात? यावर भर दिला. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व त्यांना जागतिक दृष्टिकोन प्राप्त होतो, असे प्राचार्या गीता जोशी यांनी सांगितले. एआयएमएल विभाग प्रमुख रूपाली पोहकर, स्वप्नाली पाटील उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी माहितीपूर्ण, प्रेरक आणि प्रेरणादायी संवादात्मक सत्रात सक्रिय सहभाग घेतला.



## सिमेंट कंपनीसोबत सामंजस्य करार

■ राजर्षी शाहू इंजिनिअरिंग कॉलेज, ताथवडे

नव्या युगातील प्रगत बांधकाम साहित्याबाबत संशोधन आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी अल्ट्राटेक सिमेंट आणि जेएसपीएमच्या राजर्षी शाहू कॉलेजच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागात सामंजस्य करार झाला. या सहकार्यातून उभारलेल्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर न्यू एज ॲडव्हान्स कन्स्ट्रक्शन मटेरियल्स'चे उद्घाटन विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी आणि अल्ट्राटेक सिमेंटचे फंक्शनल टेक्निकल हेड राहुल गोयल यांच्या हस्ते झाले. अल्ट्राटेकचे अरविंद महाजन, विशाल कुलकर्णी, जेएसपीएम संकुल अध्यक्ष अनिल भोसले आणि डॉ. पी. पी. विटकर उपस्थित होते. शाहू कॉलेजचे संचालक डॉ. ए. एम. बडधे यांचे मार्गदर्शन लाभले. सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. जे. आर. धनूस्कर यांनी आभार मानले. प्रा. रमा पवार यांनी संयोजन केले.



## महिला सुरक्षेसाठी विद्यार्थ्यांचा परिसंवाद

■ प्रा. रामकृष्णा मोरे महाविद्यालय, आकुर्डी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय यांच्यातर्फे गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'महिला किंवा युवती सुरक्षेमधील माझी भूमिका किंवा जबाबदारी आणि शाश्वत विकास' विषयावर विद्यार्थी सहभाग परिसंवाद यशस्वी झाला. प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उपप्राचार्य डॉ. हिरालाल सोनवणे, प्रा. डॉ. मधुकर राठोड, डॉ. रेखा जोशी व प्रा. डॉ. वर्षा श्रीराम यांनी संपूर्ण नियोजन केले. सूत्रसंचालन शिल्पा वाजे, अल्फिया मुलाणी आणि निकिता कुंभार यांनी केले. प्रा. विक्रांत शेळके, प्रा. संगीता साळवे, प्रा. शैलजा सांगळे आणि प्रा. शशिकांत मेमाणे यांनी परीक्षण केले. सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

नवराष्ट्र Pune | 04 February 2026 | Page 5

जबाबदार आरोग्यसेवा प्रदान करणे शक्य होते.

व्यावसायिकांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि जागतिक आरोग्यसेवा अनुभव मिळण्याची संधी प्राप्त होईल.



# जिज्ञासूवृत्तीने ज्ञानप्राप्ती करावी

## डॉ. अरविंद नातू; शाहू कॉलेजमध्ये टेक्नो–सोशल महोत्सव

**पिंपरी, प्रतिनिधी.** दैनंदिन जीवनातील प्रत्येक घटनेमागे विज्ञान दडलेले असून, ते समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती बाळगणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन कोलकाता येथील IISERच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू यांनी केले.जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'इनोव्हिजन २०२६' या भव्य टेक्नो–सोशल महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. नातू बोलत होते.उद्घाटन समारंभास करिअर समुपदेशक डॉ. दीपक शिकारपूर, मॅग्ना इंटरनॅशनलचे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर,



टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ. पी. पी. विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे, शाहू कॉलेजचे संचालक डॉ. अविनाश बडधे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. बडधे यांनी सांगितले की, 'इनोव्हिजन' हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य व ज्ञानविनिमयाचे प्रभावी व्यासपीठ आहे. यावर्षीची संकल्पना 'समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान' असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती व सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करण्यात आला आहे.डॉ. शिकारपूर यांनी २०२६ मध्ये एआय आणि नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्यांसोबत संवाद कौशल्ये आणि सॉफ्ट स्किल्सचा महत्व यावर भर देण्याचे मार्गदर्शन केले.या महोत्सवात सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी सुमारे १ हजार प्रकल्प सादर केले आहेत, ज्यामुळे शैक्षणिक, सामाजिक व तांत्रिक नवकल्पनांचा संगम अनुभवता आला.

केसरी

पुणे, ३ फेब्रुवारी २०२६

# जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे : डॉ. नातू

**पिंपरी** : दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेले असते. मात्र आपण वैज्ञानिक दृष्ट्या ते जाणून घेतले पाहिजे.यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजेत. असे मत कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ अरविंद नातू यांनी व्यक्त केले.



जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इनोव्हिजन २०२६ या भव्य टेक्नो-सोशल महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते .

या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर,मॅग्ना इंटरनॅशनल चे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, श्यामसुंदर मडेवार,युवा उद्योजक राजेश साबणे, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ पी.पी विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे आदी उपस्थित होते.

डॉ बडधे म्हणाले कि,इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे.इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ शिकारपूर म्हणाले कि,२०२६ सालामध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वात महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे . जागतिकीकरणामुळे केवळ तंत्रज्ञान माहीत असणे पुरेसे नाही, तर संवाद साधणेही महत्त्वाचे झाले आहे. भारतीय कंपन्या आता युरोप, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या देशांमध्ये आपला व्यवसाय वाढवत आहेत. अशा वेळी जपानी, जर्मन, फ्रेंच किंवा मँडरीन (चिनी) भाषा येणाऱ्या तंत्रज्ञांना इतरांच्या तुलनेत ३० ते ४० टक्के जास्त पगार आणि परदेशात कामाची संधी मिळत आहे. एआय भाषांतर करत असले तरी, मानवी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि व्यावसायिक करारांसाठी भाषेचे ज्ञान असणे हे एक मोठे कौशल्य मानले जात आहे.तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडिलवर काम करत आहेत. डॉ पैठणे म्हणाले की या महोत्सवामध्ये सुमारे ४ हजार विद्यार्थ्यांनी आपले विविध क्षेत्रातील प्रकल्प सादर केले आहेत. यामध्ये स्किल डेव्हलपमेंट, शोध निबंध, प्रकल्प प्रदर्शन, रोबोटिक्स, काँक्रीट क्यूब, इलेक्ट्रो सर्किट डिझाईन, कोडिंग अशा विविध प्रकल्पांचा या मध्ये समावेश आहे. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर मते यांनी तर स्वागत समन्वयक डॉ. अजय पैठणे केले. आभार डॉ. प्रवीण घटे यांनी मानले.सूत्रसंचालन अथर्व मुनोत, तेजस चौधरी, इशिता जाधव, ओमकार काळे यांनी केले.

LIBRARY TATHAWADE

सकाळ

पुणे, बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.

# दैनंदिन जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा

## डॉ. अरविंद नातू; 'इनोव्हिजन २०२६' टेक्नो सोशल महोत्सवात मार्गदर्शन

पिंपरी, ता. ३ : "दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेले असते. मात्र, आपण ते वैज्ञानिकदृष्ट्या जाणून घेतले पाहिजे. यासाठी आपण जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे," असे मत कोलकता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू यांनी व्यक्त केले.

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे 'इनोव्हिजन २०२६' या टेक्नो सोशल महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. करिअर समुपदेशक डॉ. दीपक शिकारपूर, मॅग्ना इंटरनॅशनलचे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, 'सकाळ'च्या यिनचे प्रमुख श्यामसुंदर माडेवार, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ. पी. पी. विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ. सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ. अविनाश बडधे आदी उपस्थित होते.

डॉ. बडधे म्हणाले, "इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जातो. इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे. इनोव्हिजन २०२६ ची यावर्षीची संकल्पना समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ. शिकारपूर म्हणाले, "२०२६ मध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे, आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वांत महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे. तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे. कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडेलवर काम करत आहेत. डॉ. बडधे म्हणाले, "ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळावी, यासाठी प्रवेश सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला." विविध कल्पना, स्पर्धात्मक वातावरण आणि देशभरातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्याची संधी इनोव्हिजन २०२६ विद्यार्थ्यांना देणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. पैठणे म्हणाले, "या महोत्सवात सुमारे चार हजार विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील प्रकल्प सादर केले आहेत. स्किल डेव्हलपमेंट, शोध निबंध, प्रकल्प प्रदर्शन, रोबोटिक्स, कॉंक्रिट क्यूब, इलेक्ट्रो सर्किट डिझाईन, कोडिंग अशा विविध प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर मते यांनी केले. सूत्रसंचालन अथर्व मुनोत, तेजस चौधरी, इशिता जाधव, ओमकार काळे यांनी केले. स्वागत डॉ. अजय पैठणे यांनी केले. आभार डॉ. प्रवीण घटे यांनी मानले.